अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था, कल्याण, जि.ठाणे या संस्थेस मौ.चांग्याचा पाडा/साकडबाव, ता.शहापूर, जि.ठाणे येथे आदिम जमातीतील कातकरी समाजातील विद्यार्थ्यांसाठी अनुदानित आश्रमशाळा चालविण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः अआशा-२०१८/प्र.क्र.११३/का-११

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९

वाचा :१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे आदेश क्र.अनुआशा-२०१४/प्र.क्र.०९/का.७(३), दिनांक २२ एप्रिल, २०१६.

२) आदिवासी विकास विभाग, शासन आदेश क्र.अपिल-२०१६/प्र.क्र.१६८/का.११, दिनांक १ डिसेंबर, २०१६.

प्रस्तावना :

राज्यातील अनुसूचित जमातींपैकी कातकरी, माडीयागोंड, कोलाम या जमाती अतिमागास आहेत. त्यांचे शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. केंद्र शासनाच्या निधीतून आदिम जमातीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. जनजाती सल्लागार परिषदेच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये आदिम जमातीसाठी स्वतंत्र आश्रमशाळा सुरु करण्याची शिफारस जनजाती सल्लगार परिषदेने केलेली आहे. सदरच्या आश्रमशाळा अतिरिक्तपणे सुरु न करता कायमस्वरुपी बंद करण्यात आलेल्या अनुदानित आश्रमशाळा आदिम जमातीसाठी काम करणाऱ्या संस्थांना चालविण्यास देण्याचे प्रस्तावित आहे

२. अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था, कल्याण, जि.ठाणे ही स्वयंसेवी संस्था चांग्याचा पाडा, ता.शहापूर, जि.ठाणे येथे कातकरी समाजातील मुलींसाठी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत स्वयंअर्थसहाय्यित शाळा सन १९९९ पासून चालवित असून आजपर्यंत नियमितपणे सुरु आहे. सदर संस्थेमार्फत गेली ३५ वर्षे आदिवासी महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये अनेक समाजोपयोगी प्रकल्प महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या मदतीने राबविले जातात. सदर संस्थेस सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय काम केल्यामुळे शासनामार्फत दलितमित्र व शाहू फुले आंबेडकर पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. संस्थेला शाळा चालविण्यासाठी पुरेसा शैक्षणिक अनुभव असून संस्थेकडे जमिनीसह इतर सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.

३. आदिवासी जमाती मधील शासनाने आदिम जाती म्हणून ज्यांना घोषित केले त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांच्या मुलींना शिक्षण द्यावे या उद्देशाने संस्थेने मौ.चांग्याचा पाडा (खराडे), ता.शहापूर, जि.ठाणे येथे स्वयंअर्थसहाय्यित शाळा सुरु केली आहे. मात्र आर्थिक अडचणींमुळे संस्थेस सदर शाळा चालविणे अशक्य होत आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभाग अंतर्गत कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतची अनुदानित आश्रमशाळा कातकरी समाजाच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपलब्ध करुन आश्रमशाळेचे स्थलांतरण करुन चालविण्यास देण्याबाबतचा प्रस्ताव अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था, कल्याण, जि.ठाणे या संस्थेने शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने दिनांक २८.०८.२०१९ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सदर संस्थेस आश्रमशाळा स्थलांतरीत करुन देण्याबाबतचा निर्णय घेण्याचे विचाराधीन होते.

शासन निर्णय:

अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था, कल्याण, जि.ठाणे या संस्थेस अनुदानित आश्रमशाळा गोंदेडा, ता.चिमूर, जि.चंद्रपूर ही इयत्ता १ ली ते १० पर्यंतची आश्रमशाळा स्थलांतरीत करुन मौ.चांग्याचा पाडा/साकडबाव, ता.शहापूर, जि.ठाणे या ठिकाणी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून पुढील ३ वर्षांसाठी प्रायोगिक तत्वावर अनुसूचित जमातीमधील कातकरी या आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी खालील अटींच्या अधीन राहून चालविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१) बालकांचा सक्तीचा व मोफत शिक्षणाचा अधिकार, अधिनियम, २००९ अंतर्गत नमुद करण्यात आलेल्या सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२) स्वयंसेवी संस्थेने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्ती करतांना शासनाने विहित केलेल्या अटी-शर्ती व नियमांचे पालन करावे. विहित अर्हताप्राप्त कर्मचा-याची नेमणूक न केल्यास संस्थेस देय असलेले अनुदान अनुज्ञेय असणार नाही. प्रकरणपरत्वे आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यात येईल. अप्रशिक्षित शिक्षक उमेदवारांची नियुक्ती केल्यास त्यांच्या वेतनाची जबाबदारी शासनाची राहणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

३) संस्थेने आश्रमशाळेत वर्गखोल्या व निवासाची स्वतंत्र इमारतीमध्ये व्यवस्था करावी. तसेच इमारतीमध्ये मानकाप्रमाणे स्नानगृहे, शौचालय व इतर सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच शुध्द पाण्याची मुबलक व्यवस्थाही उपलब्ध करुन द्यावी.

४) संस्थेस शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सुत्रानुसार व नियमानूसार अनुदान अनुज्ञेय राहील.

५) संस्थेने सदर आश्रमशाळा अन्य संस्थेस चालविण्यास देवू नये.

६) आश्रमशाळा संहिता नियम व आदिवासी विकास विभागाने अनुदानित आश्रमशाळेसंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

७) आश्रमशाळेतील आवश्यक पद भरतीसाठी अपर आयुक्त, ठाणे यांची मान्यता घेण्यात यावी.

८) सदर आश्रमशाळेस प्रथमत: ३ वर्षासाठी मान्यता देण्यात येत असून अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी ३ वर्षानंतर सदर आश्रमशाळेचे मुल्यांकन करुन अहवाल शासनास सादर करावा. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर आश्रमशाळेस कायमस्वरुपी मान्यता देण्याबाबत शासनामार्फत निर्णय घेण्यात येईल.

२. शासनाने विहित केलेल्या अटी, शर्ती व नियमांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच उपरोक्त आश्रमशाळेबाबत गैरव्यवहार / गैरव्यवस्थापन याबाबत तक्रारी आल्यास संस्थेच्या आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६१६४८२८४१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.09.16 17:00:06 +05'30'

(सु. ना. शिंदे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.प्रधान सचिव (आदिवासी विकास विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक.

८. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नागपूर.
९. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे
१०. जिल्हाधिकारी, ठाणे/चंद्रपूर.
११. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर, जि.चंद्रपूर.
१३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर, जि.ठाणे.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे/चंद्रपूर.
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१७. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१८. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे/चंद्रपूर.
१९. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे/चंद्रपूर.
२०. विभागीय सहसंचालक (शिक्षण), ठाणे.
२१. अध्यक्ष/सचिव, अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था, कल्याण, जि.ठाणे
२२. निवड नस्ती (का.११).